<u>वादीचा साक्षीदार क्र.१ चा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे ॲड. श्री. एस. एस. आंबडकर यांचे मार्फत:–</u>

2. माझ्या कुटुंबात मी व माझे इतर चार भाऊ आहेत. मला दोन बहिणी आहेत. माझी आई सध्या हयात आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती ह्या प्रतिवादी क्र.१ याने दि.०७/०६/१९८४ रोजी खरेदी केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींव्यतिरीक्त आमच्या कुटुंबाच्या गट क्र.१८१, गट क्र.१९५/१/१, गट क्र.१९५/१/२, गट क्र.४८२/२, गट क्र.४८२/३, गट क्र.१४१, गट क्र.३७१/१, गट क्र.३७८/२, गट क्र.३७९/१/१, गट क्र.३७९/१/२, गट क्र.१९२/१, गट क्र.१४२ व गट क्र.३७९/१/३ यामधील जमिनी आमच्या एकत्रित कुटुंबाच्या मिळकती आहेत. सदरील जमिनी आमच्या खरेदी केलेल्या जमिनी आहेत. सदरील गट क्रमांकामधील जमिनी कोणाच्या नावे, हे मला सांगता येणार नाही.

3. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी क्र.१ सन १९८० सालापासुन विभक्त राहतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या प्रतिवादी क्र.१ याच्या स्वकष्टाच्या उत्पन्नातुन घेतलेल्या असुन त्या प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी महाराष्ट्र राज्य स्टेट को. ऑपरेटीव्ह या बँकेचे दि.२०/०८/१९८४ रोजी कर्ज घेतले होते व त्या कर्जाची दि.०३/०९/२००१ रोजी परतफेड केल्यानंतर दावा मिळकतीवर माझ्या नावाची नोंद फेरफार क्र.२८३३ अन्वये झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या फेरफाराचा गैरफायदा घेवुन मी प्रस्तुत

दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याला आर्थिक व मानसिक त्रास देण्यासाठी मी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपस पुर्ण.

सरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MAYURSINGH DILIPSINGH GAUTAM
Date: 2024.07.19 17:41:40 +0530

दिनांकः १९/०७/२०२४
राहुरी

**(मयुरसिंह दि. गौतम)**
2 रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
राहुरी.